# कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना लि,गौतमनगर.

पो.कोळपेवाडी,ता.कोपरगांव,जि.अहमदनगर.

जा.क्र.ऊस विकास/ २०८७ दिनांक - ७/०९/२०२१

## -: परिपत्रक :-

## -: ऊस पिकावरील किड व रोगाचे एकात्मिक नियंत्रण :-

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते की,कारखाना कार्यक्षेत्रामध्ये काही ठिकाणी ऊसावर पांढरी माशी ,हुमणी ,पांढरा लोकरी मावा व इतर किर्डीचा प्रादुर्भाव दिसुन येत आहे.या किर्डीमुळे ऊसाचे वजनात व साखर उताऱ्यात घट होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान होवु शकते .सदर किर्डीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी व किर्डीचे एकात्मिक नियंत्रणासाठी सर्व ऊस उत्पादकांनी एकत्रित खालील प्रमाणे उपाययोजना कराव्यात.

| अ.न | किड व रोगाचे नाव | लक्षणे | करावयाच्या उपाययोजना |
|---|---|---|---|
| १ | हुमणी | या किडीची अळी ऊस पिकाची मुळे कुरतडुन खाते त्यामुळे ऊस वाळुन नुकसान होते.अळीचा कालावधी २८१ दिवस इतका जास्त असल्यामुळे वेळीच नियंत्रण न केल्यास ऊसाचे पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान होते. | १) ऊसाच्या सरीमध्ये **क्लोरोपायरीफॉस ५०%**प्रती एकरी १ लिटर ४०० लि. पाण्यातुन आळवणी करावी<br>**किंवा**<br>२) लिसेंटा २०० ग्रॅम किटकनाशक प्रती एकरी ४०० लिटर पाण्यामध्ये मिसळुन आळवणी करावी<br>**किंवा**<br>३) **फिप्रोनील ०.३%(रिजेंट)** दाणेदार प्रती एकरी १० किलो घेवुन ऊसाचे मुळाजवळ रासायनिक खतात मिसळुन टाकणे.<br>**किंवा**<br>४) व्ही.एस.आय. निर्मित द्रवरुप जैविक किटकनाशक **(B.V.M)** प्रती एकरी २ लिटर घेवुन ४०० लिटर पाण्यातुन आळवणी अथवा ठिबक मधुन दयावे. |
| २ | पांढरी माशी | पांढऱ्या माशीची बाल्यावस्था पानाच्या मागील बाजुने रस शोषण करते.त्यामुळे पाने निस्तेज होतात व पिवळी पडुन वाळतात.परिणामी ऊसाचे वजनात व साखर उताऱ्यात कमालीची घट आढळुन येते.<br>पांढ्या माशीने ग्रस्त ऊसाचे पानांवर काळया रंगाची बुरशी (कॅपनोडीयम) आढळते ज्यामुळे पानांची अन्न तयार करण्याची क्रिया मंदावते पाने वाळतात | **प्रती एकरी फवारणीकरीता**<br>**१) पाणी + युरिया + ॲसीफेट + नुवॉन**<br>**२०० लि. ४ किलो २५० ग्रॅम ४००मिली.**<br>**किंवा**<br>**२) पाणी + युरिया + इमीडॅक्लोप्रीड १७.८%**<br>**२०० लि. ४ किलो १००मिली**<br>**किंवा**<br>३) व्ही.एस.आय निर्मित द्रवरुप जैविक किटकनाशक **मेटाराइजियम ॲनिसोपली व व्हर्टिसेलियम लेकानी (B.V.M)** ची एकरी २ लि. प्रती एकर ४०० लि.पाण्यातुन फवारणी करावी.<br>**किडीचा जास्त प्रादुर्भाव असल्यास एकरी एक गोणी जादा युरिया (नत्र) टाकावे म्हणजे किडग्रस्त ऊस सुधारतो.** |

**मागील पानावर/-**

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | पांढरा लोकरी मावा | १.पांढरा लोकरी मावा ऊसाच्या पानाच्या पाठीमागील बाजुस बसलेला असतो<br>२.पानातील गोड रस शोषुन घेतो.बाहेर फेकलेला गोड पदार्थ खालच्या पानावर वरील बाजुस पडतो व त्यावर काळया रंगाची बुरशी वाढते त्यामुळे संपुर्ण पान काळे पडते.परिणामी अन्न तयार करण्याची क्रिया मंदावते व पाने कोरडी पडुन वाळतात.ऊस कमकुवत होतो आणि वाढ खुंटते उत्पन्न व साखर उताऱ्यात घट येते. | प्रति एकरी फवारणी करीता<br>१) पाणी + व्ही.व्ही.एम (v.s.i निर्मित)<br>२०० लि २ लि.<br>किंवा<br>२) पाणी + डायमेथोएट ३० % (रोगर)<br>२०० लि. ४०० मिली )<br>किंवा<br>३) पाणी + ॲसीफेट ७५%<br>२०० लि. २५० ग्रॅम<br>किंवा<br>मॅलाथिऑन ४% भुकटी १५ किलो प्रती एकरी ऊसपिकावर धुरळावी. |
| ४ | ऊस पिकाच्या पानावरील तपकिरी ठिपके (ब्राउन स्पॉट) | हा बुरशीजन्य रोग असुन तो **(सरकोस्पोरा लाँगीपस)** या बुरशीमुळे होतो.रोग करणाऱ्या बुरशीची लागण सर्वप्रथम जुन्या पानावर होते.त्यामुळे ऊसाच्या पानावर लाल तपकिरी रंगाचे अंडाकृती ठिपके दिसुन येतात.रोगाची तीव्रता वाढल्यावर ऊसाच्या पानांचा पुर्ण भाग व्यापला जातो.त्यानंतर पाने करपतात वाळतात दुरुन रोगग्रस्त पिक तांबेरा रोगाने ग्रासल्यासारखे दिसते.पर्यायाने पानांची अन्न तयार करण्याची क्रिया मंदावते व उत्पन्नात घट येते.पावसाळयात जास्त काळ पाणी साचलेल्या जमिनीत तसेच भारी जमिनीत ऊस पिकास या रोगाची तिव्रता जास्त असते. | प्रति एकरी फवारणी करीता<br>१) पाणी + कॉपर ऑक्झीक्लोराईड + स्टिकर<br>२००लि. ५००ग्रॅम १०० मि.ली<br>किंवा<br>२) पाणी + मॅंकोझेब + स्टिकर<br>२००लि. ५००ग्रॅम १००मि.ली<br><br>( फवारणीचा कालावधी-२ ते ३ फवारण्या १५ दिवसाच्या अंतराने करणे ) |

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादकांनी व उपरोक्त सर्व पध्दतींचा समन्वय साधुन किड व रोगाचे नियंत्रण करावे तसेच अधिक माहितीसाठी कारखान्याचे ऊस विकास कार्यालयात संपर्क साधावा /

आपला विश्वासु,
गि.ज.जगताप
कार्यकारी संचालक